दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

इतरांच्या सेवेत स्वतःला समर्पित करा.
तुमचा 'स्व' तुम्हाला सापडेल.

SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 34 ■ शनिवार, 25 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

## जिल्ह्यातील साखर कारखानदारीवर पश्चिम महाराष्ट्राची पकड, आता आणखी काही व्यवहार चर्चेत

# १० साखर कारखाने पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या ताब्यात, आणखी एका कारखान्यावर येणार वर्चस्व

## कारखानदारीच्या माध्यमातून राजकीय वर्चस्व,तानाजी सावंतांकडे ४, स्व. अजित पवार परिवारासह आमदार सुभाष देशमुख,आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे कारखान्यांची मालकी,आता बोत्रे पाटलांची एन्ट्री ?





जगदीश गवळी
प्रतिनिधी -कळंब

आरंभ मराठी विशेष

**कळंब: धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखानदारीत मोठी उलथापालथ सुरू असल्याची चर्चा आहे. सहकारी चळवळीची मजबूत परंपरा असलेल्या या जिल्ह्यात आता बहुतांश कारखान्यांचे नियंत्रण पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग समूहांकडे गेले असून, जिल्ह्यातील १४ पैकी ११ कारखाने पश्चिम महाराष्ट्रातील राजकारण्याकडे असून,आता आणखी एक खासगी आणि दोन सहकारी कारखाने बोत्रे पाटील ताब्यात घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे.**

मराठवाड्यातील पहिला सर्वात मोठा सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचा मान मिळालेल्या धाराशिव जिल्ह्यातील साखर कारखानदारी मात्र आता पश्चिम महाराष्ट्राच्या घशात घातली जात आहे. जिल्ह्यात १४ साखर कारखाने आहेत, त्यापैकी ११ कारखाने बाहेरच्या नेत्यांकडे आहेत. अल्पावधीतच केवळ सहा ते सात वर्षांच्या कालावधीत राज्यातील साखर क्षेत्रात झपाट्याने विस्तार करत सर्वाधिक कारखाने ताब्यात असलेले नवे "साखर सम्राट" म्हणून उद्योगपती बाबुराव बोत्रे पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे. सध्या राज्यातील १७ साखर कारखाने त्यांच्या व्यवस्थापनाखाली ताब्यात आहेत.विशेष म्हणजे, त्यांचा उद्योगविश्वातील प्रवास सोलापूर जिल्ह्यातील ओंकार शुगर प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यापासून सुरू झाल्याचे सांगितले जाते. त्या प्रवासातून त्यांनी अल्पावधीतच साखर क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.याच पार्श्वभूमीवर, आता नव्याने आणखी ९ साखर कारखाने त्यांच्या अधिपत्याखाली जाणार असल्याच्या जोरदार चर्चा सुरू असून, त्यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील एकूण ३ कारखान्यांचा समावेश असल्याचे समजते. तसे झाल्यास त्यांच्या प्रभावाखालील कारखान्यांची संख्या २६ पर्यंत पोहोचू शकते.











### धाराशिवमधील चर्चेत असलेले तीन कारखाने कोणते ?

धाराशिव जिल्ह्यांतील साखर कारखानदारीवर आधीच पश्चिम महाराष्ट्राचे वर्चस्व असून, आणखी तीन कारखाने बोत्रे पाटलांच्या ताब्यात जाणार असल्याची जोरदार चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहे.मात्र हे तीन साखर कारखाने कोणते याबाबत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मनात उत्सुकता आहे. या तीन कारखान्यांचे व्यवहार झाल्यास बोत्रे पाटलांच्या माध्यमातून पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदारीचे वर्चस्व अधिक वाढेल आणि जिल्ह्यातील १४ पैकी ११ साखर कारखान्यांवर पश्चिम महाराष्ट्राची मदार असेल.

### स्थानिक नेतृत्वावर प्रश्नचिन्ह ?

अनेक कारखाने आर्थिक अडचणी, कर्जबाजारीपणा, बंद गाळप हंगाम, व्यवस्थापनातील त्रुटी आणि गुंतवणुकीच्या अभावामुळे संकटात सापडल्याने सोलापूर आणि लातूर जिल्ह्यातील उद्योग समूहांना संधी मिळत आहे, मात्र स्थानिक नेतृत्वाबद्दल त्यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### असा आहे पश्चिम महाराष्ट्राचा जिल्ह्यावर दबदबा

माजी मंत्री डॉ. तानाजी सावंत गट – ४ कारखाने (भैरवनाथ शुगर-सोनारी, शिवशक्ती साखर कारखाना- तांदुळवाडी, नृसिंह साखर कारखाना इंदापूर,ता. वाशी आणि तेरणा शेतकरी साखर कारखाना, ढोकी), आ. अभिजीत पाटील धाराशिव साखर कारखाना (चोरखली, ता. कळंब), स्व. अजित पवार कुटुंबाशी संबंधित भाऊसाहेब बिराजदार कारखाना (बलसुर), बाणगंगा (अंतरगाव,भूम), गोकुळ शुगर सोलापूर यांच्याकडे तुळजाभवानी साखर कारखाना (नळदुर्ग, ता. तुळजापूर). सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे लोहारा तालुक्यातील खेड येथील लोकमंगल साखर कारखाना आहे. लातूर येथील देशमुख परिवाराने देखील कंचेश्वर शुगरच्या माध्यमातून जिल्ह्यातील कारखानदारीत एन्ट्री केली आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील नेतृत्वाकडे केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर सहकारी साखर कारखाना (केशेगाव, ता.धाराशिव), श्री विठ्ठल साई (मुरूम), नॅचरल शुगर (रांजणी) एवढेच कारखाने असून, आमदार डॉ.तानाजी सावंत वगळता अन्य आमदार आणि खासदारांकडे स्वतंत्र साखर कारखान्याचे व्यवस्थापन नाही हे विशेष.

### राजकीय ताकद वाढण्यास मदत

साखर कारखाने हे ग्रामीण राजकारणाचे शक्तिकेंद्र मानले जातात. त्यामुळे कारखान्यांचे नियंत्रण बदलल्यास स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा,विधानसभा आणि सहकार क्षेत्रातील समीकरणांवरही परिणाम होऊ शकतो. आमदार डॉ. तानाजी सावंत यांनी साखर कारखान्यांच्या माध्यमातून जिल्ह्यात राजकीय ताकद वाढवली आहे.

## तुळजापूरात शहरात सलग दुसऱ्या दिवशी अतिक्रमण हटाव मोहिम: प्रमुख मार्ग झाले मोकळे

**तुळजापूर** :- तीर्थक्षेत्र तुळजापूरात नगरपरिषदेकडून अतिक्रमण हटाव मोहीम सलग दुसऱ्या दिवशीही जोरदारपणे राबवण्यात आली. गुरुवारी भवानी रोड, महाद्वार रोड परिसरात कारवाई केल्यानंतर शुक्रवारी (दि. 24) शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते दीपक चौक, घाटशिळ रोड, कार पार्किंग परिसर, वेताळ नगर, कुंभार गल्ली तसेच पावन हॉटेल शेजारील भागात अतिक्रमण



हटविण्यात आले. कुंभार गल्ली येथून श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले होते. व्यापाऱ्यांनी स्पर्धेच्या अतिरेकातून रस्त्यावरच दुकाने उभारल्याने पादचाऱ्यांसाठी केवळ ३ ते ४ फूट जागा उरली होती. या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने कडक भूमिका घेत अतिक्रमण हटवून मार्ग मोकळा केला. परिणामी, अनेक दिवसांनंतर रस्ता रुंद आणि मोकळा दिसू लागला असून भाविक व नागरिकांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, नगरपरिषदेची ही मोहीम कौतुकास्पद असली तरी ती किती दिवस सातत्याने राबवली जाईल, हटवलेले अतिक्रमण पुन्हा उभे राहणार नाही ना, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. प्रशासनाने पुढील काळातही नियमित देखरेख व कठोर कारवाई ठेवण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## पोहायला गेलेल्या तरुणाचा तेरणा नदीत बुडून मृत्यू

**तेर** :- धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत गोरोबाकाका मंदिराजवळ तेरणा नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सायंकाळी अंधार पडल्यामुळे सुरू असलेली शोधमोहीम तात्पुरती थांबविण्यात आली असून शनिवारी सकाळी पुन्हा शोधकार्य हाती घेतले जाणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तेर येथील अमर लक्ष्मण देवकुळे (वय ३५) हे शुक्रवार (दि. २४) रोजी सकाळच्या सुमारास संत गोरोबाकाका मंदिराजवळील तेरणा नदीत कपडे



धुण्यासाठी गेले होते. यावेळी ते पोहत असताना अचानक पाण्यात बुडाले. घटनेची माहिती गावात समजताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत तातडीने शोधकार्य सुरू केले. दरम्यान, दुपारच्या सुमारास तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांच्या सूचनेनुसार धाराशिव येथील राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाचे जवान बोटीसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नदीच्या पात्रात कसून शोधमोहीम राबविली. मात्र सायंकाळपर्यंत संबंधित तरुणाचा ठावठिकाणा लागला नाही. अंधार वाढल्यामुळे सायंकाळी सुमारे ६ वाजता शोधकार्य थांबविण्यात आले. घटनास्थळी ग्राम महसूल अधिकारी प्रशांत देशमुख, ढोकी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विलास हजारे तसेच पोलीस हवालदार विलास माळी यांनी ठाण मांडून परिस्थितीवर लक्ष ठेवले होते. दरम्यान, शनिवारी सकाळपासून पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती ग्राम महसूल अधिकारी प्रशांत देशमुख यांनी दिली आहे.

आरंभ मराठी

### कौडगाव येथे टेक्निकल टेक्सटाइल पार्क व डिफेन्स हब उभारणीला गती मिळणार: आमदार राणा पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती

# धाराशिव जिल्ह्यात २ हजार कोटींच्या गुंतवणूकीतून ३ हजार युवकांना रोजगाराची संधी मिळणार

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात उद्योगवाढीसाठी पोषक वातावरण तयार होत असून येत्या काळात तब्बल २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या गुंतवणुकीमुळे सुमारे ३ हजार तरुणांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती मित्र संस्थेचे उपाध्यक्ष तथा आमदार राणा पाटील यांनी शुक्रवारी (दि.२४) पत्रकार परिषदेत दिली. आमदार पाटील म्हणाले की, उद्योगसमूह निबे इंडस्ट्रीजच्या माध्यमातून ही मोठी गुंतवणूक होणार आहे. मागील वर्षी चाकण येथे या कंपनीच्या एका फॅक्टरीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी कंपनीचे प्रमुख गणेश निबे यांनी धाराशिव जिल्ह्यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार आता कौडगाव येथे मोठा औद्योगिक प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. कौडगाव येथे टेक्निकल टेक्सटाइल पार्क उभारण्यात येणार असून येथे टीएनटी व प्रोपेलंट निर्मितीचे प्रकल्प उभारले जाणार आहेत. या परिसरात सुमारे १००० एकर जमीन उपलब्ध असून त्यापैकी ८०० एकर जमीन ग्लोबल फोर्ज कंपनीने मागितली आहे. मंत्रिमंडळाच्या उपसमितीने या मागणीला तत्वतः मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी सुमारे २००० केमिकल इंजिनिअर्सची गरज भासणार असून इतर १००० कर्मचाऱ्यांनाही रोजगार मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे २ हजार कोटींची गुंतवणूक करण्याची तयारी संबंधित उद्योगसमूहाने



दर्शविली असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय भारत बायोगॅस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत २०० एकर क्षेत्रावर सीबीजी (कॉम्प्रेस्ड बायोगॅस) प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पासाठी नेपियर गवताचा वापर कच्चा माल म्हणून केला जाणार असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नेपियर गवत उत्पादनातून अतिरिक्त उत्पन्नाची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सीबीजीचे पहिले युनिट कौडगाव येथे सुरू करून पुढील टप्प्यात जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांमध्ये असे प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे शेतीपूरक उद्योगांना चालना मिळणार असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दरम्यान, धाराशिव जिल्ह्याला डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून विकसित करण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. यासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन आवश्यक असून कौडगाव परिसरालगत सुमारे ४ हजार एकर सलग जमीन उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. शेतीसाठी वापरात नसलेल्या पडीक जमिनींचा शोध घेऊन त्या भूसंपादनाद्वारे उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या सर्व प्रकल्पांमुळे धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून रोजगारनिर्मितीबरोबरच शेतकरी व स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणा पाटील यांनी व्यक्त केला.

### खरीप पीक विम्याचा प्रश्न लवकरच सुटेल

खरीप पीक विम्याच्या बाबतीत विमा कंपनीने ज्या तक्रारी केल्या होत्या त्याची सचिव स्तरावर सुनावणी सुरू आहे. पुढच्या आठवड्यात यावर निर्णय होईल अशी अपेक्षा आहे. कंपनीने यील्ड बेस्ड द्वारे जे उत्पादन काढले आहे ते 10 ते 13 क्विंटल इतके आहे. त्यावर आमचा आक्षेप असल्याचे आमदार राणा पाटील म्हणाले. कारण अतिवृष्टीमुळे आपल्याकडे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. यासंदर्भात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे आपले म्हणणे मांडले आहे. तांत्रिक उत्पादनाच्या आकडेवारीला पन्नास टक्के महत्व आहे. त्यामुळे या मुद्यावर काही बाबी स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे आमदार राणा पाटील म्हणाले.

## कत्तलीसाठी 40 गोवंशिय वासरांची वाहतूक: परंडा पोलिसांची कारवाई

आरंभ मराठी । परंडा

करमाळा ते धाराशिव रोडवरील रोसा गावाजवळ अवैधरीत्या गोवंशीय वासरांची कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या वाहनावर परंडा पोलिसांनी कारवाई करत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत 40 वासरे व वाहन असा एकूण सुमारे 9 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तोफीक निसार मुलानी (वय 35, रा. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) हा द 23 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास पिकअप वाहन (क्र. एमएच 12 डीटी 1122) मधून 40 गोवंशीय वासरे कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती परंडा पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहन अडवून तपासणी केली असता, वासरांचे तोंड व पाय बांधून अत्यंत कमी जागेत कोंबून ठेवलेले आढळले. त्यामुळे त्यांना हालचाल करता येत नव्हती आणि त्यांना अमानुष वेदना होत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी पोलिसांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 मधील कलम 5(अ), 5(ब), 9(ब), 11 तसेच प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक अधिनियम 1960 मधील कलम 11(1), 11(1)(अ), 11(1)(फ), 11(1)(ह), 11(1)(i) आणि प्राण्यांच्या वाहतूक नियमांतील कलम 47, 54, 56 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# नीट परीक्षा २०२६ : आत्मविश्वासाने सामोरे जा


**प्रा. सोमनाथ लांडगे,**
संचालक श्री साई श्रध्दा
एज्युकेशन नीट ऑनलाइन टेस्ट सिरीज
ॲडमिशन कौन्सलिंग प्रोसेस
आर. पी. कॉलेज समोर, धाराशिव.
मो. ९४२२९४१९२९,
९४२०२७८२५८




नीट ही केवळ एक परीक्षा नाही तर अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे स्वप्न असते – डॉक्टर होण्याचे, समाजसेवेचे आणि आपल्या कुटुंबाचे नाव उज्ज्वल करण्याचे आणि ते पुर्ण करणायाची ती संधी आहे. नीट २०२६ ही संधी आहे स्वतःच्या क्षमतांची चाचणी घेण्याची आणि त्या दिशेने पहिले पाऊल टाकण्याची. पण ही परीक्षा उत्तम रित्या द्यायची असेल, तर केवळ अभ्यास करून चालत नाही, तर योग्य दिशा, मनोबल आणि चांगले नियोजन असणेही तितकेच आवश्यक आहे. नीट २०२६ ची परिक्षा ३ मे २०२६ रोजी एकाच दिवशी देशभरात निवडक परिक्षा केंद्रावर होणार आहे. नीट परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होत असते. या वर्षात जवळपास २३ लाख विद्यार्थी नीट ची परिक्षा देणार असून, त्यामानाने इतर कोर्सेसला कमी स्पर्धा असल्याचे जाणवते आहे. नीट परीक्षेतील यशासाठी काही गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. त्याची सविस्तर चर्चा आपण करु या.

**१. अभ्यासाचा मजबूत पाया :**
नीट ची तयारी म्हणजे ११ वी आणि १२ वी चा अभ्यासक्रम (NCERT आधारित) पक्का करणं अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी काही महत्त्वपूर्ण घटक बघू या.

**कमी वेळेत काय कराल ?:**
नीट परीक्षेत विशेषतः बायोलॉजीसाठी प्रत्येक ओळीवर वेगवेगळे प्रश्न विचारले जाऊ शकतात. त्यासाठी गांभीर्याने नियोजन पूर्वक बायलॉजी ची चांगली तयारी केली तर यशाचा पाया मजबूत होणे शक्य आहे.

**दैनंदिन अभ्यास :** रोजचा अभ्यासाचा वेळ स्वतः ठरवा. दैनंदिन अभ्यास झालाच पाहिजे याची पुरेपूर काळजी घ्या. अभ्यास सातत्याने करा. 'सातत्य हे यशाचं गमक आहे.'

**२. टाइम टेबल – आपली योग्य दिशा :**
एक चांगलं अभ्यासाचं टाइम टेबल हे फक्त वेळ ठरवणं नाही, तर आपल्या ऊर्जा आणि मानसिकतेनुसार अभ्यास ठरवणं असतं.त्यासाठी अभ्यासाचे दैनंदिन वेळापत्रक बनवा. जे वेळापत्रक आपण बनवले आहे ते शंभर टक्के पाळण्याचा प्रयत्न करा.

**३. अभ्यास करताना छोटा ब्रेक घ्या :**
अभ्यास करत असताना सतत आपण अभ्यास करत बसलात तर लक्ष केंद्रित करणं, त्याचबरोबर शारीरिक गोष्टीवर नियंत्रण ठेवणे हे अडचणीचं होत जातं. विषेशतः पाठीचे दुखणे ही समस्या उद्भवते. अशा वेळेस सलग अभ्यास करत असताना मध्ये - मध्ये ब्रेक घेणे गरजेचे असते. त्यासाठी २५ मिनिटे अभ्यास, ५ मिनिटे विश्रांती. ही अतिशय चांगली पद्धत आहे.

**४. रिविजन :**
आपण जसे अभ्यासाचे नियोजन करत असतो त्या नियोजनामध्ये पुढे - पुढे अभ्यास करत जात असताना मागील झालेल्या घटकावर रिविजन होणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे असते. त्यामुळे रिविजन साठी वेगळा वेळ द्या.
दिवसातून किमान २ तास हे फक्त रिविजनसाठी ठेवा.

**५. सतत परिक्षा, टेस्ट सराव :**
जशी आपली परीक्षा जवळ आली तसे आपण सतत - सतत परीक्षा देणं गरजेचं असतं. सतत सतत टेस्ट देणं गरजेचं असतं. उपलब्ध असतील तर टेस्ट सिरीज देणेही तितकच गरजेचं असतं.सतत टेस्ट सिरीज मधून आपल्या चुका शोधा आणि त्यावर काम करा. त्यासोबतच झालेल्या चुकाची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही याचीही काळजी घ्या.

**६. टेस्ट सिरीज आणि PYQs :**
मॉक टेस्ट्स हे परीक्षेपूर्वीची खरी तयारी आहे. ती जितकी जास्त द्याल, तितकी परीक्षा सुसह्य होईल. पूर्वीच्या प्रश्नपत्रिका (PYQs) सोडवा. यातून पेपरचा पॅटर्न, प्रश्नांचा टोन, चांगली तयारी झालेले टॉपिक्स आणि आवडते टॉपिक्स लक्षात येतात.

**७. मानसिक तयारी :**
आपली स्पर्धा स्वतःशी असावी, इतरांशी नाही. स्वतःचं कालचं प्रदर्शन आजच्या तुलनेत सुधारणं हेच खरे यश.
नकारात्मक विचारांपासून दूर रहा – 'मी नाही जमवू शकत', 'हे खूप कठीण आहे' असे विचार मनातून दूर करा. अशी अडचण आपल्या मनाला सतत स्पर्श करत असेल तर तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. आपली कौन्सलिंग त्यांच्याकडून करून घ्या. त्यांच्या मार्गदर्शनाने आपल्या मध्ये सुधारणा होण्यासाठी निश्चितच मदत होईल.

**८. ध्यान आणि व्यायाम :**
रोज १० -१५ मिनिटे मेडिटेशन किंवा हलका व्यायाम करा. योगा केला तरी चालेल. यामुळे तुम्ही आपले मन शांत ठेवता.

**९. परीक्षेच्या दिवशी काय कराल ? :**
पेपर सुरू होण्यापूर्वी स्वतःवर विश्वास ठेवा. 'मी खूप मेहनत केली आहे. मी हे करू शकतो/शकते.' असा मनाचा निर्धार करा. यश तुमची वाट बघत आहे.
वेळेचं नियोजन :
नीट परीक्षेत यश मिळवायचे असेल तर **३ तासांत सर्व विषय व्यवस्थित मॅनेज करा.**
सोप्या प्रश्नांना आधी प्राधान्य द्या :
नीट ची परीक्षा ही नकारात्मक गुण मूल्यमापन पद्धतीची असल्यामुळे जास्तीत जास्त प्रश्न आपले बरोबर येणे गरजेचे आहे. यामुळे सोप्या प्रश्नांना प्राधान्यक्रम द्या. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढतो.ज्या प्रश्नांची उत्तरं नक्की माहीत नाहीत, ती शेवटी करा आणि नेगेटिव्ह मार्किंगपासून स्वतःचा बचाव करा.

**शेवटचे १० दिवस – यशाकडे नेणारा अंतिम टप्पा :**
नीट परीक्षेपूर्वीचा शेवटचा १० दिवसांचा काळ म्हणजे 'last lap' – शेवटचा धावपळीतला टप्पा. या काळालाच गोल्डन अवर्स म्हणायला हरकत नाही. या टप्प्यातील प्रत्येक दिवस, प्रत्येक तास महत्त्वाचा असतो. आतापर्यंत कितीही अभ्यास केला असो, किंवा राहिला असो – आता ही १० दिवसांची मेहनतच शेवटी तुमचं स्थान ठरवणार असते. या टप्प्यात घाई नाही, पण शिस्त आणि दिशा हवी असते.

**१. नवीन अभ्यास कमी – आधी केलेलंच जास्त रिविजन करा :**
नवीन टॉपिक्स शिकण्याचा व करण्याचा मोह टाळा. नवीन विषय जास्त गोंधळ निर्माण करतात.
आतापर्यंत जे काही वाचलं आहे, फक्त त्याचं जास्तीत जास्त रिविजन करा.

**२. आपले टिपण, शॉर्ट नोट्स, फॉर्म्युला चार्ट्स यावर लक्ष केंद्रित करा.**

**३. डेली रिविजन प्लॅन तयार करा.**

**४. दिवसाचे ३ भाग करा :**
सकाळी : बायोलॉजी रिविजन करा. बायलॉजी वरती विशेष लक्ष द्या. कारण बायलॉजी विषय सोपा आहे. त्याचबरोबर तुमचे जास्तीत जास्त मार्क कव्हर करणारा विषय आहे.
दुपारी : फिजिक्सचे सूत्रं, सोल्व्ह केलेले प्रश्न आणि मागील चुकांवर काम करा. जास्तीत जास्त रिविजन वर भर द्या.संध्याकाळी : केमिस्ट्री – ऑर्गॅनिक, इनऑर्गॅनिक आणि फिजिकलचा या पार्टची झकास रिविजन करा.
तुमच्या नियोजनानुसार सकाळ, दुपार व संध्याकाळ हे विषय तुम्ही बदलून सुद्धा तयारी करू शकता. पण जास्त वेळ हा बायोलॉजी साठी राखीव ठेवा.

**५. दिवसाअखेर जास्तीत जास्त प्रश्नांसाठी जलद रिविजन करा, म्हणजे लक्षात राहायला मदत होते.**

**६. मॉक टेस्ट्स आणि PYQs – दररोज एक पेपर सोडवा :**
दररोज किमान एक तरी फुल सिल्याबस वर ७२० मार्काची मॉक टेस्ट द्या. ही टेस्ट वेळ लावून सोडवा. टेस्ट झाल्यावर चांगला वेळ त्याच्या विश्लेषणासाठी द्या. कुठे चुका झाल्या ?कोणते टॉपिक कमी पक्के आहेत? वेळ कुठे वाया गेला? याचे विश्लेषण केल्यानंतर चुका लक्षात येतील आणि या चुका परत नाही होऊ दिल्या तर तुमची यामुळेच खरी सुधारणा होते.

**७. नेगेटिव्ह मार्किंगपासून सावध रहा :**
मागील चुका लक्षात ठेवा. तसेच अंदाजाने उत्तरं टाकण्याची सवय कमी करा. प्रश्न सोडवताना 'Confident Answer' वरच टिकून रहा.

**८. मनोबल टिकवा – आत्मविश्वास ठेवा :**
मॉक टेस्ट किंवा टेस्ट सिरीज देत असताना एखादा पेपर कठीण गेला तरी स्वतःवर शंका घेऊ नका. 'मी हे करू शकतो/शकते' हा विचार मनात ठेवा.

**९. झोप आणि जेवण व्यवस्थित ठेवा : तुमची रात्रीची झोप किमान ६ – ७ तासांची हवीच.**

**१०. परीक्षेच्या दिवशीची उत्तम तयारी करून परिक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा.**

**परिक्षा वेळे प्रमाणे मॉक टेस्ट द्या :**
शक्य झाल्यास आपल्या नीट च्या परीक्षेच्या वेळेप्रमाणे मॉक टेस्ट द्या. नीट २०२६ चा निकाल या १० दिवसांच्या वापरावर ठरणार आहे. त्यामुळे हे दिवस 'तणावाचे' नाही, तर 'तयारीचे' समजा. स्वतःच्या क्षमतेवर पुर्ण विश्वास ठेवा. वेळ, मन आणि ऊर्जेचा योग्य वापर करा. तुमची झुंज यशस्वी होणार, याची खात्री ठेवा.
'शेवटपर्यंत लढा – कारण यश अगदी जवळ असतं!'
तुमचं भविष्य काय असेल हे जाणून घेण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यासाठी स्वतःला घडवणं. हे तुम्ही पंधरा दिवसात जेवढे उत्तम घडवाल तेवढे तुम्ही छान यशस्वी व्हा.
नीट २०२६ साठी मनात एक विचार ठेवा – 'मी करणारच!' आणि त्या दिशेने एक एक पाऊल ठामपणे टाका. तुमचे यश काही काळानंतर तुमचे स्वागत करण्यासाठी फुलांचा गुच्छ घेऊन तयार आहे. फक्त त्या यशाला तुम्ही गवसणी घालने बाकी राहिलेले आहे.

**पालकांची भूमिका :**
आपल्या मुलानी किंवा मुलीने नीट परीक्षेमध्ये चांगले यश मिळवावे असे आपणाला वाटत असल्यास आपली ही तेवढीच खंबीर साथ आपल्या मुलासोबत असणे गरजेचे आहे. मुलाच्या अडीअडचणी समजून घेणे गरजेचे आहे. मुलाच्या मनामध्ये काय चाललेलं आहे हे ही जाणून घेणे गरजेचे आहे. काही प्रश्न निर्माण होत असतील तर मुलाच्या त्या प्रश्नाचं समाधानी करणे गरजेचे आहे. मुलाच्या वेळेनुसार राहिलेले दिवस तुम्ही अड्जेस्ट करून तुमचं काम करणं गरजेचं आहे. जर आपला मुलगा थोडासा डिस्टर्ब झालाय असं वाटत असेल तर तज्ञ शिक्षकाकडे स्वतः घेऊन जाऊन जे प्रश्न असतील त्यांच्यापुढे सविस्तर मांडून मुलाला प्रोत्साहित करणं गरजेचं आहे. आपला मुलगा सध्या ज्या मॉक टेस्ट देत **आहे त्या मॉक टेस्ट सोडवत असताना आपण त्याला जर साथ दिली** पाहिजे. तो पेपर सोडवत असताना आपणही त्याच्याकडे लक्ष दिलं तर त्याच्याही अडचणी तुम्हाला समजून येण्यास मदत होईल.

आपणही सकारात्मक रहा. आपल्या मुलाला सकारात्मक ठेवा. त्याच्या यशाबद्दल तुम्हीही खात्री बाळगा आणि मुलालाही सांगा तू वर्षभर कठीण अभ्यास केलेला आहे. यश तुझच आहे तू यशस्वी होणार चिंता करू नको. मात्र हे पंधरा दिवस तुला संघर्षाचे आहेत. तुला खूप तुला चांगला अभ्यास करावा लागेल. अशा पद्धतीने सकारात्मक सोबत रहा. आपल्या मुलाच्या यशामध्ये तुमची सुद्धा यश आहे.

**सध्या नीट परिक्षेसाठी आपण केलेल्या नियोजनाला प्रयत्न करून सातत्याने सत्यामध्ये उतरावा. सर्व नीट ची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा. आपणास भरभरून यश मिळो. आपण ठरवलेल्या कोर्सला व ठरवलेल्या कॉलेजला आपल्याला प्रवेश मिळो या सदिच्छा.**

# भाजपच्या नेत्यांना उद्रेकाचा फटका


**शिवाजी विठ्ठल चौगुले**
मु.पो. मासा बेलेवाडी,
कागल-कोल्हापूर




...राजकारणात लोकांचा आवाज ऐकला जातो, असे नेहमी सांगितले जाते; पण काही वेळा तो आवाज ऐकूनही न ऐकल्यासारखे केले जाते. मात्र, कधी कधी तोच आवाज इतका तीव्र होतो की तो केवळ एका घटनेपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर आरसा धरतो. मुंबईतील जांबोरी मैदान परिसरात महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर काढण्यात आलेल्या भाजपच्या जनआक्रोश मोर्चादरम्यान घडलेली घटना याचेच ठळक उदाहरण म्हणावे. एका सामान्य महिलेचा संताप, तिचा स्पष्ट आणि निर्भीड सूर आणि त्यातून उमटलेला संदेश याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. या घटनेत मंत्री गिरीश महाजन यांच्यासमोर त्या महिलेचा व्यक्त झालेला संताप हा व्यक्तीविरोधातील नव्हे, तर तो सर्वपक्षीय राजकीय प्रवृत्तीविरोधातील होता. मोर्चा, आंदोलन, सभा ही लोकशाहीची साधने आहेत, याबद्दल दुमत नाही. पण या साधनांचा वापर करताना सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा विचार केला जातो का, हा मूलभूत प्रश्न या प्रसंगातून पुढे आला. रस्ते अडवून, वाहतूक खोळंबा करून, लाखो लोकांच्या रोजच्या आयुष्यात अडथळे निर्माण करून जर राजकीय शक्तिप्रदर्शन केले जात असेल, तर त्यातून निर्माण होणारा रोष अपरिहार्य आहे. आजच्या काळात सोशल मीडियाची ताकद अशी आहे की, एका क्षणात एखादी घटना संपूर्ण देशभरच नव्हे तर जगभर पोहोचते. या महिलेचा व्हिडिओही तसाच वाऱ्यासारखा पसरला. पण या व्हिडिओचे वैशिष्ट्य हे होते की, तो केवळ व्हायरल झाला नाही, तर त्याला लोकांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला. लोकांनी त्या महिलेच्या भावना समजून घेतल्या, तिच्या संतापाशी स्वतःला जोडले. मात्र, या प्रतिक्रियेचा अर्थ काही जणांनी आपल्या सोयीप्रमाणे लावण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षांनी या घटनेचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न केला, ही बाब लपून राहिलेली नाही. भाजपविरोधात लोकांमध्ये असलेला रोष म्हणून या घटनेला रंगवण्याचा प्रयत्न झाला. पण ही मांडणी जितकी सोयीस्कर, तितकीच अपुरी आहे. या संतापामागे कोणत्याही विशिष्ट पक्षाविरोधातील भावना नव्हती, तर ती होती व्यवस्थेच्या त्या वृत्तीविरोधातील प्रतिक्रिया, जिथे जनतेच्या सोयीपेक्षा राजकीय कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाते. ही बाब केवळ सत्ताधाऱ्यांपुरती मर्यादित नाही. कॉंग्रेस असो, शरद पवारांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस असो, उबाठा पक्ष असो किंवा इतर कोणतेही राजकीय गट असोत. सर्वांनी वेळोवेळी असे मोर्चे, आंदोलने आणि रस्ते अडवण्याचे प्रकार केले आहेत. त्यामुळे या घटनेचा वापर करून केवळ एका पक्षावर टीका करणे म्हणजे मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष करणे होय. प्रश्न कोणाचा मोर्चा आहे, हा नाही. तर तो कसा काढला जातो आणि त्याचा परिणाम कोणावर होतो, असा आहे. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार आहे, पण त्याचवेळी नागरिकांच्या हक्कांचाही आदर राखणे आवश्यक आहे. रस्त्यावर अडकलेल्या रुग्णवाहिका, प्रसव वेदनेत तळमळणारी महिला, वेळेवर पोहोचू न शकलेले कामगार, परीक्षेला उशीर झालेली मुले या सगळ्यांचा विचार कोण करणार? राजकीय पक्षांनी आपल्या शक्तिप्रदर्शनाच्या नादात या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यामुळेच हा उद्रेक त्या महिलेच्या संतापातून व्यक्त झाला. कधी तरी हे होणारच होते. सत्ताधारी म्हणून भाजपकडून अधिक जबाबदारपणाची अपेक्षा आहे. सत्ता ही केवळ अधिकार देत नाही, तर ती उत्तरदायित्वही वाढवते. अशा वेळी जर त्यांच्या कार्यक्रमांमुळेच नागरिकांना त्रास होत असेल, तर त्याचे गांभीर्य अधिकच वाढते. प्रशासनावर प्रभाव असताना, पर्यायी मार्गाची व्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सोयींचे नियोजन करणे शक्य असते. पण ते न करता जर केवळ गर्दी जमवणे आणि शक्ती दाखवणे यालाच प्राधान्य दिले गेले, तर तो लोकशाहीचा अपमान ठरतो. त्याचवेळी, विरोधी पक्षांची भूमिकादेखील तितकीच महत्त्वाची आहे. कॉंग्रेसचे नेते नाना पटोले आणि उबाठाचे नेते संजय राऊत या प्रकरणात भाजपवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. सत्ताधाऱ्यांवर टीका करणे हे त्यांचे कर्तव्य असले तरी राजकीय नेते म्हणून आपण सगळे एकाच पाण्यातील मासे आहोत याचा त्यांना विसर पडत आहे. केवळ एखाद्या घटनेचा राजकीय फायदा उचलण्याच्या नादात जर मूळ मुद्दाच बाजूला पडला, तर ती टीका प्रभावहीन ठरते. या प्रकरणातही तेच झालेले दिसते. त्या महिलेचा राग समजून घेण्याऐवजी, तो आपल्या राजकीय फायद्यासाठी वापरण्याची घाई दिसून आली.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात लाजिरवाणी आणि संतापजनक बाब म्हणजे, मंत्र्यांना जाब विचारणाऱ्या त्या महिलेच्या आवाजाला उत्तर देण्याऐवजी काही महाभागांनी तिच्याच चारित्र्यावर घाव घालण्याचा उद्योग सुरू केला आहे. सार्वजनिक जीवनात प्रश्न विचारणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असताना, त्या अधिकाराचा वापर करणाऱ्या महिलेची बदनामी करून तिचा आवाज दाबण्याचा हा प्रकार अत्यंत घातक आणि निषेधार्ह आहे. सोशल मीडियाच्या अराजक जगात एका तोंडाळ महिलेचे अश्लील भाषेतील व्हिडिओ पुढे करून जणू तीच 'संतप्त महिला' असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही केवळ दिशाभूल नाही, तर जाणीवपूर्वक रचलेली बदनामीची मोहीम आहे. विशेष म्हणजे, ज्या महिलेने संताप व्यक्त केला तिची खरी ओळखही अधिकृतपणे समोर आलेली नसताना, तिच्यावर अशा प्रकारे चिखलफेक केली जाणे हे तिच्या वैयक्तिक सन्मानावर केलेले थेट आघात आहेत. हा प्रकार समाजातील त्या विकृत मानसिकतेचे द्योतक आहे. जिथे स्त्रीने आवाज उठवला की तिच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभे करून तिला गप्प बसवले जाते. अशा प्रवृत्ती लोकशाहीच्या मुळांनाच पोखरत असतात. त्या मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी व्यक्तीला लक्ष्य केले जाते. भाजपच्या नेत्यांना उद्रेकाचा फटका बसला म्हणून विरोधी पक्षातील नेते खुशीत गाजरे खात आहेत, पण त्यांना हे कळत नाही की, सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने त्या महिलेने ती सर्वपक्षीयांच्या निर्वावलेपणाला दिलेली सणसणीत चपराक आहे.


# १० लाखांची खंडणी न दिल्याने विद्युत टॉवर कापला; सव्वा कोटींचे नुकसान

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

तुळजापूर तालुक्यातील मुर्टा शिवारात खंडणी न दिल्याच्या रागातून थेट उच्चदाब विद्युत टॉवर कापून मोठे नुकसान केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी निखली भगवान पाटील (रा. मुर्टा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. २२ एप्रिल २०२६ रोजी फिर्यादी पार्थ जनकराव त्रिवेदी (वय ३०, व्यवसाय – इलेक्ट्रिक इंजिनिअर) यांच्याकडे १० लाख रुपयांची खंडणी मागितली. पैसे न दिल्यास विद्युत टॉवर कापून नुकसान करण्याची धमकीही दिली होती. दरम्यान, मुर्टा शिवारातील गट क्रमांक २९७/२ मधील टाटा पावर रिन्युएबल एनर्जी लिमीटेड कंपनीने उभारलेल्या १३२ केव्ही क्षमतेच्या विद्युत वाहक टॉवरवर लाईन सुरू असतानाच आरोपीने गॅस कटरच्या साहाय्याने टॉवर क्रमांक २१ चे चारही लोखंडी खांब कापले. या निष्काळजी व धोकादायक कृत्यामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला. या घटनेत सुमारे १ कोटी २० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पार्थ त्रिवेदी यांनी दिलेल्या तक्रारीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०८(२), ११०, ३२४(५), १२५ तसेच कलम १३९, १४० भारतीय विद्युत अधिनियम आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम कलम ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिला आरक्षण की राजकीय डावपेच?


**रमेश कृष्णराव लांजेवार**
स्वतंत्र पत्रकार,
नागपूर.

देशात पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर आदर्श आचारसंहिता लागू असताना केंद्र सरकारने अचानक विशेष अधिवेशन बोलावले. या अधिवेशनात महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि पुनर्रचना आयोगाशी संबंधित विधेयके मांडण्यात आली. मात्र या अधिवेशनामागील खरा उद्देश काय होता, याबाबत राजकीय वर्तुळात आणि जनतेमध्ये मोठी चर्चा रंगली.या विशेष अधिवेशनात २० सप्टेंबर २०२३ रोजी मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाला बाजूला सारून लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० करण्याचा प्रस्ताव पुढे आणण्यात आला. त्यामधून ३३ टक्के महिला आरक्षण देण्याचा सरकारचा प्रयत्न होता, अशी चर्चा होती.



परंतु हा प्रस्ताव मतदानात नामंजूर झाला आणि सरकारचा हा डाव फसल्याचे चित्र दिसून आले. विधेयक फेटाळल्यानंतर सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडून विरोधकांवर जोरदार टीका करण्यात आली. "महिला आरक्षणाची भ्रूणहत्या", "महिलांची स्वप्ने चिरडली" अशा तीव्र प्रतिक्रिया देण्यात आल्या. मात्र येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो—जर सरकारला महिला आरक्षणाची इतकीच काळजी होती, तर २०२३ मध्ये मंजूर झालेल्या विधेयकाची अंमलबजावणी या अधिवेशनात का करण्यात आली नाही ?यावरून असे दिसून येते की, विद्यमान ५४३ लोकसभा सदस्यांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याबाबत सरकारची तयारी नव्हती. त्यामुळेच नवीन विधेयक आणून मूळ मुद्दा बदलण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप केला जात आहे. विरोधकांवर दोषारोप करण्यापेक्षा या निर्णयामागील सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच, जर महिला सक्षमीकरणाबाबत सरकार गंभीर असेल, तर अलीकडील विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षातून ३३ टक्के महिलांना उमेदवारी का देण्यात आली नाही, हा प्रश्नही उपस्थित होतो. यामुळे महिला आरक्षणाचा मुद्दा केवळ राजकीय फायद्यासाठी वापरला जात असल्याचे चित्र निर्माण होते.१६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात सखोल चर्चा झाली, मोठा आर्थिक खर्च झाला, मात्र शेवटी विधेयक नामंजूर झाले. यामुळे या अधिवेशनाच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.१३१ व्या घटनादुरुस्ती विधेयकानुसार लोकसभा सदस्यसंख्या ८५० करण्याचा प्रस्ताव होता. परंतु अशा प्रकारची वाढ करण्यासाठी आधी जनगणना होणे आवश्यक असते. जनगणनाच झालेली नसताना सदस्यसंख्या वाढविण्याचा प्रस्ताव मांडणे हे तांत्रिकदृष्ट्या वादग्रस्त ठरते.लोकसभा सदस्यसंख्या वाढल्यास त्याचा परिणाम राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषदांवरही होईल. परिणामी, शेकडो नव्या लोकप्रतिनिधींचा पगार, भत्ते आणि इतर खर्च यामुळे देशाच्या तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडू शकतो. हा भार अखेरीस जनतेवरच येणार आहे. आज देशात आधीच लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायती अशा विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात लोकप्रतिनिधी कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत खासदारांची संख्या वाढविण्याची खरी गरज काय, हा प्रश्नही उपस्थित होतो.जर हा अतिरिक्त खर्च देशाच्या विकासासाठी, रोजगारनिर्मितीसाठी, महागाई नियंत्रणासाठी किंवा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी वापरण्यात आला, तर त्याचा अधिक सकारात्मक परिणाम दिसू शकतो. मात्र या मुद्द्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका केली जात आहे.लोकसंख्या वाढीचा आधार देत सदस्यसंख्या वाढविण्याची गरज सांगितली जाते, परंतु त्याच प्रमाणात बेरोजगारी, शेतकरी प्रश्न आणि सरकारी विभागांतील मनुष्यबळाची कमतरता या गंभीर मुद्द्यांकडे सरकारचे लक्ष का जात नाही, हा प्रश्न आज अधिक तीव्रतेने समोर येत आहे.या सर्व घडामोडींवरून असे स्पष्ट होते की, महिला आरक्षणासारखा महत्त्वाचा विषयही राजकीय फायद्यासाठी वापरला जात आहे. विशेष अधिवेशनातून देशाच्या हितासाठी ठोस निर्णय अपेक्षित असताना, राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाच अधिक महत्त्व दिले गेले, ही बाब चिंताजनक आहे.


हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

# धाराशिव जिल्ह्यात ५७४ रुग्णांना ४.८४ कोटींची वैद्यकीय सहायता मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून आरोग्यसेवेला गती



आरंभ मराठी । धाराशिव

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. धाराशिव जिल्ह्यात आर्थिक वर्षात ५७४ रुग्णांना सुमारे ४ कोटी ८४ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

### २० गंभीर आजारासाठी मदत

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

### सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

### आर्थिक वर्षातील मदत

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत जिल्ह्यातील ५७४ रुग्णांना सुमारे ४ कोटी ८४ लाख ८१ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# सामाजिक, राजकीय क्षेत्रात प्रभावी कार्य

## ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील यांना विधान परिषदेच्या माध्यमातून संधी द्या



आरंभ मराठी । धाराशिव

जिल्ह्यात सामाजिक तसेच राजकीय, धार्मिक क्षेत्रात विशेष कामगिरी करणारे ॲड. व्यंकट गुंड पाटील यांना विधानपरिषदेच्या निवडणुकीत उमेदवारी द्यावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून केली जात आहे. ॲड. गुंड पाटील हे भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक आहेत. पाडोळी (आ.) गावातून उभा राहिलेला गुंड परिवार गेल्या चार दशकांपासून सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रात प्रभावी कामगिरी करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारात वाढलेले ॲड. गुंड यांनी विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांसारख्या संघटनांमध्येही सक्रिय काम केले आहे. ते प्रथम व द्वितीय वर्ग शिक्षित स्वयंसेवक असून, 1977 साली पुणे येथे प्रथम वर्ग तर 1984 साली नाशिक येथील केटिएचएम महाविद्यालयात द्वितीय वर्ग स्वयंसेवक प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ते भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. गुंड कुटुंबाची राजकीय परंपरा देखील उल्लेखनीय आहे. त्यांच्या ज्येष्ठ बंधूंनी अनेक वर्षे सरपंच, जिल्हा परिषद सदस्य व उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. तसेच कुटुंबातील इतर सदस्यांनीही सरपंच, जिल्हा परिषद सदस्य व सहकारी संस्थांमध्ये विविध पदांवर काम करत विकासकामांना चालना दिली आहे. स्वतः ॲड. व्यंकटराव गुंड यांनीही सरपंच तसेच गृहरक्षक दलाच्या जिल्हा समादेशक पदावर कार्य करत प्रशासनिक अनुभव मिळवला आहे. औद्योगिक क्षेत्रात त्यांनी उभारलेला रूपामाता उद्योग समूह आज परिसरातील शेतकरी, कामगार व बेरोजगारांसाठी आधारवड ठरत आहे. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती व आर्थिक विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे मानले जाते. धाराशिव लोकसभा मतदारसंघात ॲड. गुंड यांचा मोठा जनसंपर्क असून, स्थानिक पातळीवर त्यांची मजबूत पकड आहे.

# तेर येथे नरसिंह सार्वजनिक वाचनालयात जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा

आरंभ मराठी । तेर



तेर येथील श्री नरसिंह सार्वजनिक वाचनालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पुस्तक व प्रतिमा पूजन करून वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान स्थानिक पत्रकार बांधवांचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार साहेबराव सौदागर, प्रा. हनुमंत कोळपे तसेच ग्रंथपाल मिना सौदागर (वडवले) यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्यांसह पत्रकार बापू नाईकवाडी, इर्शाद मुलानी, गोरख माळी, विकास भोरे, संगिता वैद्य, स्वाती भक्ते, अश्विनी कोल्हे आदी उपस्थित होते. महिलांचीही लक्षणीय उपस्थिती होती. वाचनालयाच्या वतीने दरवर्षी २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जात असून, वाचनाची आवड वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# दाऊतपुर येथील जनता दरबारात विविध विभागांच्या समस्यांवर तत्काळ निवारण

आरंभ मराठी । धाराशिव



आमदार जगजीतसिंह पाटील यांच्या सूचनेनुसार शुक्रवारी (दि.२४) इर्ला गणातील दाऊतपुर येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धाराशिव पंचायत समितीच्या सभापती गोकर्णा गोपाळ कदम यांनी भूषविले. या जनता दरबाराला कोंड गटाचे जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब खांडेकर, दाऊतपुरचे सरपंच बंकट शिंदे, इर्ला येथील सरपंच अण्णा पाटील, रामवाडीचे सरपंच बाळासाहेब कोळी, वानेवाडीच्या सरपंच मीराताई जाधव यांच्यासह सुनील माने, विशाल थोरात, ठवरे साहेब, हरिभाऊ सोलंकर, अमोल भांगे, मदन महाडिक, रमेश गादेकर तसेच इरला गणातील सर्व बूथ प्रमुख, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामसेवक, अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस, आरोग्य केंद्रातील कर्मचारी, महिला व बालविकास विभागाच्या अधिकारी (तेर पाटील मॅडम), जिल्हा परिषद व पंचायत समितीचे अभियंते तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जनता दरबारात बांधकाम, आरोग्य, घरकुल, पाणीपुरवठा, मनरेगा, पशुसंवर्धन, शिक्षण, अंगणवाडी, तहसील आणि महावितरण या विभागांशी संबंधित नागरिकांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. अनेक समस्यांचे तात्काळ निवारण करण्यात आले, तर उर्वरित प्रलंबित प्रश्नांसाठी निवेदने स्वीकारून त्या समस्या पुढील दहा दिवसांत सोडविण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. तसेच विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक व सार्वजनिक योजनांची सविस्तर माहिती नागरिकांना देण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन मिळाले.

# येरमाळा ग्रामस्थांकडून संतोष तौर व संकेत आगळे यांचा सत्कार



आरंभ मराठी । येरमाळा

कळंब तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालकपदी भारतीय जनता पार्टीचे संतोष बाबासाहेब तौर यांची निवड झाल्याबद्दल तसेच महाराष्ट्र पोलीस दलात सोलापूर शहर पोलिस पदी संकेत सुधीर आगळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल येरमाळा ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने बुधवारी (दि.२२) त्यांचा गौरवपूर्वक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक शिवाजी (अण्णा) बारकुल यांच्या हस्ते संतोष बाबासाहेब तौर यांचा तर मुरहरी जनार्दन कांबळे यांच्या हस्ते संकेत आगळे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सभापती विकास (भाऊ) बारकुल, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही मान्यवरांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पोलिस भरतीत निवड झाल्याबद्दल नारंगवाडीच्या अपूर्वा पवारचा श्री जयराम विद्यालयात सत्कार

आरंभ मराठी । नारंगवाडी



उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथील श्री जयराम विद्यालयात दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी अपूर्वा नेताजी पवार हिचा विशेष सत्कार करण्यात आला. धाराशिव पोलीस दलात निवड झाल्याबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक अजय पवार यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला. अपूर्वा पवार ही या विद्यालयाची माजी विद्यार्थिनी असून तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नारंगवाडी येथेच झाले आहे. शेतकरी कुटुंबातून येत असतानाही जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर तिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, नारंगवाडी गावातून पोलीस दलात निवड होणारी ती पहिली महिला ठरली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात तिचे कौतुक होत असून, तिने विद्यालयातील मुलींसमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाच्या वतीने तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगवी मार्डीतील मुख्य चौक सुशोभीकरणासाठी निधीची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर



तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी येथे गावाच्या मुख्य चौकातील भगवा ध्वज परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी ग्रामपंचायतीने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी तेरणा युथ फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. सांगवी मार्डी गावातील मुख्य चौकात भगवा ध्वज उभारण्यात आलेला असून, हा परिसर सध्या अस्वच्छतेच्या विळख्यात सापडला आहे. चौक परिसरात काही नागरिकांकडून लघुशंका केली जात असल्याचे प्रकारही निदर्शनास येत आहेत. त्यामुळे ध्वजाच्या पावित्र्याला बाधा येत असून नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. गावाचे सौंदर्य वाढविण्यासोबतच ध्वज परिसराचे पावित्र्य जपण्यासाठी या भागाचे सुशोभीकरण करणे अत्यावश्यक असल्याचे तेरणा युथ फाउंडेशनचे मत आहे. यासाठी ग्रामनिधी किंवा १५ व्या वित्त आयोगाच्या तरतुदीतून निधी मंजूर करावा, अशी मागणी तालुकाध्यक्ष मेघराज बागल यांनी ग्रामपंचायत सांगवी मार्डीकडे निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीने या मागणीची दखल घेऊन लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## भाजपकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनोखी मानवंदना

# परंड्यात भीमजयंतीनिमित्त 'शिंदेशाही'चा जल्लोष

आरंभ मराठी । परंडा




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने परंडा येथील जिल्हा परिषद शाळेत प्रख्यात कवी-गायक आनंद शिंदे यांचा 'शिंदेशाही' गाण्यांचा भव्य कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. युवा नेते मल्हार दादा पाटील यांच्या संकल्पनेतून आणि भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा महासंगीत सोहळा रंगला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. आनंद शिंदे यांच्या दमदार आणि सुरेल गायनाने भीमगीतांचा जल्लोष शिगेला पोहोचला. जयभीमच्या घोषणांनी परिसर दुमदुमला आणि उपस्थितांमध्ये उत्साह व अभिमानाची भावना निर्माण झाली. या प्रसंगी सुजितसिंह ठाकूर, मल्हार पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा विद्यमान सदस्य धनंजय सावंत, कृषी व पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे, समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद बप्पा रगडे, भाजपा नेते गौतम लटके, जयदेव गोफणे, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, जिल्हा परिषद सदस्य रेवन ढोरे, नगरसेवक तथा युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते, नगरसेवक राहुल बनसोडे, ॲड. जहीर चौधरी, तानाजी पाटील, धनाजी गायकवाड, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष प्रियंका ताई क्षीरसागर, शहराध्यक्ष ज्योती ताई भातलवंडे, शुभदा ताई शेलार यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक गायकवाड, निशिकांत क्षिरसागर, धनंजय काळे, अजिम हन्नुरे, गौरव पाटील, मनोहर पवार, अमर ठाकूर, रामदास गुडे, रामकृष्ण घोडके, सिद्दीक हन्नुरे, सुरज काळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी महायुतीचे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर हे थोर समाज सुधारक, सुनिल बडगिरे यांचे प्रतिपादन



आरंभ मराठी । उमरगा

महात्मा बसवेश्वर हे थोर समाज सुधारक होते. त्यांनी वीरशैव समाजाची पुनर्स्थापना केली. ते वयाच्या आठव्या वर्षी ज्ञानाच्या प्राप्तीसाठी घराबाहेर पडले. त्यांनी अनेक भाषेवर आपले प्रभुत्व सिद्ध केले होते. आपल्या ज्ञानप्राप्तीतून त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले, त्यात त्यांनी कर्मकांडात गुंतून न राहता, सतत चांगले कर्म करत राहा हा संदेश जगाला दिला, असे प्रतिपादन सुनील बडगिरे यांनी केले. श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून सुनील बडगिरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दाजीबा बिराजदार हे होते. तर मुख्याध्यापिका सविता लोहार, गोपाळ आष्टे, संजय कोथळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात दाजीबा बिराजदार यांनी बसवेश्वराच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन महेश कुलकर्णी तर आभार सनी सगर यांनी मानले. यावेळी दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख वक्ते व अध्यक्ष यांच्या हस्ते बसवेश्वराच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

# रक्ताचे पाणी करून पिकवलेला भाजीपाला कवडीमोल दरात

# भाजीपाला उत्पादक शेतकरी हतबल

## अवकाळी पाऊस, वाढता उत्पादन खर्च आणि पडलेले दर यामुळे बळीराजावर तिहेरी संकट



रमेश नरवडे । आरंभ मराठी

**पळसप - अवकाळी हवामानाचा फटका, दिवसेंदिवस वाढत चाललेला उत्पादन खर्च आणि बाजारातील घसरलेले दर या तिहेरी संकटामुळे पळसप परिसरातील भाजीपाला उत्पादक शेतकरी सध्या प्रचंड अडचणीत सापडले आहेत. संपूर्ण कुटुंबासह दिवस-रात्र कष्ट करून, रक्ताचे पाणी करून पिकवलेला भाजीपाला आज कवडीमोल दराने विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आणि हतबलता पसरली आहे. शेतीत घातलेला पैसाही निघत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटासोबतच मानसिक तणावात आहेत.**

सध्या बाजारात कांदा, टोमॅटो, वांगी, भेंडी, कोबी, गवार, बटाटा, भोपळा, काकडी आदी भाजीपाल्याचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. अनेक ठिकाणी तर भाजीपाला अवघ्या २ ते ५ रुपये किलो दराने विकला जात असल्याचे चित्र आहे. या दरात उत्पादन खर्च तर दूरच, तोडणी व वाहतुकीचा खर्चही निघत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. खते, बियाणे, औषधे, मजुरी आणि पाणी यासाठी मोठा खर्च करूनही अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे गणित पूर्णपणे कोलमडले आहे. त्यातच बाजारात मोठ्या प्रमाणात आलेला भाजीपाल्याचा पुरवठा, मध्यस्थांची साखळी आणि योग्य नियोजनाचा अभाव यामुळे दर कोसळले आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना आपल्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळत नाही. अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाला बाजारात नेण्याऐवजी शेतातच टाकून देण्याचा निर्णय घेतला आहे. काही ठिकाणी तर जनावरांना भाजीपाला खाऊ घालण्याची वेळ आली आहे. "बाजारात नेऊनही माल विकत नाही, उलट तोडणी व वाहतुकीचा खर्चही पदरमोड करावी लागते, मग बाजारात भाजीपाला नेण्याचा उपयोग काय?" असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत. त्यातच अलीकडे झालेल्या गारपिटीमुळे तयार पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली आहे. आलेले पीक झाडालाच सडत असल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आणि नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. भाजीपाला पिकांसाठी हमीभाव नसणे, साठवण सुविधांचा अभाव आणि प्रक्रिया उद्योगांची कमतरता ही परिस्थिती गंभीर होण्यामागची प्रमुख कारणे आहेत. शेतमालावर प्रक्रिया उद्योग उभारणे, थेट शेतकरी ते ग्राहक अशी विक्री साखळी निर्माण करणे आणि सरकारी खरेदी केंद्र सुरू करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.



### केलेल्या खर्च सोडा मजुरीही निघेना

मी यावर्षी शेतात दोन एकर मध्ये कांदा, गवार आणि वांगी लागवड केली आहे मात्र दर इतके कमी मिळत आहेत केलेला खर्च आणि मजुरीचा खर्चही निघत नाही. आता शेती करावी की नाही, असा प्रश्न पडला आहे.

**चंद्रकांत सरडे,**
शेतकरी, पळसप





### शेतमालावर प्रक्रिया उदयोग आणणे गरजेचे

मी माझ्या एक एकर शेतात यावर्षी भाजीपला पिके घेतली पण दर घसरल्यामुळे मोठ्या प्रमाणात माल बाजारात नेऊनही काहीच हातात उरत नाही. मजुरी आणि वाहतूक खर्चही जास्त पडत आहे. त्यामुळे एवढे कष्ट करूनही हातात काही उरत नाही. भाजीपाला पिकामध्ये ही सततचीच अडचण आहे जर शेतमालावर आणि इतर भाजीपाला पिकावर शासनाने प्रक्रिया उद्योग आणले तर नक्कीच शेतकऱ्यांच्या पिकाला चांगला दर मिळून शेतकऱ्यांचे कल्याण होणार होईल.

**भैरवनाथ सरडे,**
युवा शेतकरी, पळसप.

### भाजीपाला पिकांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना गरजेच्या

मी एकरात पन्नास हजार खर्च करून काकडी लागवड केली. मात्र, बाजारात दर कवडीमोल मिळत आहे त्यामुळे केलेला खर्चही निघणे कठीण झाले आहे. अशी संकटे भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांवर सतत येतात त्यामुळे भाजीपाला पिकाला खर्चाच्या तुलेनत किमान दर तरी मिळने अपेक्षित आहे. त्यामुळे शासनाने हस्तक्षेप करून भजीपाला पिकाला चांगले दिवस येतील अशा कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**प्रदीप निचळ,**
शेतकरी, घोगरेवाडी.

## जागजी शिवारात पिकांसह साहित्य जाळून २ लाखांचे नुकसान: गुन्हा दाखल

आरंभ मराठी । ढोकी

जागजी शिवारात राजमा पिकांसह शेती साहित्य जाळून सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी संदीप शिवाजी गायकवाड (रा. गुंफावाडी, ता. जि. लातूर) यांनी दि. २२ एप्रिल २०२६ रोजी रात्री १०.०० ते २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास जागजी शिवारातील फिर्यादी सचिन शिवाजी गायकवाड (वय ४२, रा. गुंफावाडी, ह.मु. पारुनगर, मुरुड) यांच्या शेतात जाऊन राजमा पिकांची जाळपोळ केली. या आगीत शेतातील स्प्रिंकलरचे सुमारे दहा पाईप, दोन ताडपत्र्या व इतर साहित्य जळून खाक झाले. या घटनेत एकूण अंदाजे २ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी फिर्यादी सचिन गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२६(एफ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे ८५५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

आरंभ मराठी । धाराशिव

दिनांक १७ एप्रिल २०२६ ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीसह जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. प्रशासनाने केलेल्या प्राथमिक पंचनाम्यानुसार १,६०७ कुटुंबे बाधित झाली आहेत. या आपत्तीमध्ये पिकांचे तसेच पशुधनाचेही नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार परंडा, कळंब, उमरगा, तुळजापूर आदी भागांना या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका बसला. जिल्ह्यातील एकूण ६८ गावे बाधित झाली असून अनेक ठिकाणी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आपत्तीमध्ये मोठ्या व लहान जनावरांचे नुकसान झाले



असून एकुण ११ जनावरांवर परिणाम झाला आहे. अवकाळी पावसामुळे काही घरांचे अंशतः नुकसान झाले असून ८ घरांना फटका बसल्याचे पंचनाम्यात नमूद आहे. जिल्ह्यातील एकूण ८५५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये जिरायत क्षेत्र २४९ हेक्टर, बागायत क्षेत्र १६४ हेक्टर आणि फळबाग क्षेत्र ४४२ हेक्टरचे नुकसान झाले आहे. विशेषतः फळबागांना मोठा फटका बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान अधिक झाल्याचे चित्र आहे. नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून लवकरात लवकर अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी प्रशासनाकडून हालचाली सुरू आहेत. अवकाळी पावसाच्या या तडाख्यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले असून तातडीने आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## वाहतूक नियमभंगावर मोठी कारवाई

### 398 वाहनांकडून 3.96 लाखांचा दंड वसूल

आरंभ मराठी । धाराशिव

शहरातील वाहतूकला शिस्त लावण्यासाठी वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करण्यात येऊन एकूण 398 प्रकरणे नोंदविण्यात आली. या कारवायांमधून तब्बल 3 लाख 96 हजार 550 रुपये इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. ही कारवाई शहरातील प्रमुख व वर्दळीच्या ठिकाणी — छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजमाता जिजाऊ चौक, देशपांडे स्टँड तसेच बस स्थानक परिसरात करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनचालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.पोलीस प्रशासनाकडून हेल्मेटचा वापर, सीटबेल्ट बांधणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे तसेच कागदपत्रे वैध ठेवणे याबाबत नागरिकांना वारंवार सूचना देण्यात येत आहेत. तरीही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली.

दैनिक आरंभ मराठी

कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी व्यापक उपाययोजना; दरघसरणीच्या कारणांचा सखोल अभ्यास होणार

## कांदा दर घसरणीवर सरकारची सचिवस्तरीय समिती गठीत

आरंभ मराठी । मुरुड

राज्यातील कांदा बाजारभावात सातत्याने होत असलेली घसरण आणि त्यामुळे शेतकऱ्यांवर येत असलेल्या आर्थिक तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत सचिवस्तरीय समिती गठीत केली आहे. या समितीमार्फत कांद्याच्या दरातील चढ-उतारावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. महाराष्ट्र हे देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य असून उत्पादन व क्षेत्रफळाच्या बाबतीत राज्य अग्रस्थानी आहे. नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, जळगाव, धाराशिव आणि धुळे हे जिल्हे कांदा उत्पादनासाठी विशेष ओळखले जातात. देशातील एकूण कांदा उत्पादनापैकी सुमारे ४० ते ५० टक्के उत्पादन महाराष्ट्रात घेतले जाते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊनही शेतकऱ्यांना दरघसरण, अपुरी साठवणूक सुविधा, पायाभूत सुविधांचा अभाव तसेच केंद्राच्या निर्यात धोरणातील अनिश्चितता अशा समस्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर २५ मार्च २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली



कांदा आढावा बैठक पार पडली होती. या बैठकीत कांदा उत्पादकांच्या अडचणींचा सखोल अभ्यास करून ठोस उपाययोजना सुचविण्यासाठी सचिवस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्य शासनाने अधिकृतरित्या समितीची स्थापना केली आहे. समितीच्या अध्यक्षपदी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे हे समितीचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत. याशिवाय प्रधान सचिव (सहकार, पणन व वस्त्रोद्योग), सचिव (कृषी व पदुम विभाग) आणि आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. समितीची कार्यकक्षा व्यापक ठेवण्यात आली असून कांदा दरघसरणीमागील कारणांचा सखोल अभ्यास करणे, तातडीच्या उपाययोजना सुचविणे, कांदा निर्यात वाढीसाठी धोरण आखणे तसेच दीर्घकालीन शाश्वत धोरण तयार करणे यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच पिक विविधीकरणाच्या दृष्टीनेही ठोस उपाययोजना सुचविण्यात येणार आहेत. समितीचा अहवाल अंतिम मान्यता मिळेपर्यंत ही समिती कार्यरत राहणार असून या माध्यमातून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रा. राजेंद्रकुमार खेंदाड यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा. राजेंद्रकुमार विश्वनाथ खेंदाड नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. प्राचार्य डॉ. श्रीरंग लोखंडे यांच्या हस्ते त्यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लोखंडे होते. यावेळी बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हासदादा बोरगावकर यांनी शुभेच्छा दिल्या. व्यासपीठावर माजी प्राचार्य जी. एस. मोहिते, डॉ. मुकुंद गायकवाड, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, डॉ. गोविंद काळे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य रमेश नन्नवरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. रमेश नन्नवरे यांनी केले, तर सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले. आभार प्रा. अमोल जोशी यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व खेंदाड परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मालकी हक्काच्या जागेतील दुकानावर अतिक्रमण कारवाई केल्यामुळे तुळजापूर नगरपरिषदेविरोधात तक्रार



कान
मीर
धित
र

## 2020 च्या पीक विमा प्रकरणात पुढील सुनावणी 6 मे रोजी

आरंभ मराठी | धाराशिव

खरीप 2020 हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत दाखल करण्यात आलेल्या पीक विमा प्रकरणात पुन्हा एकदा ‘तारीख पे तारीख’ची स्थिती निर्माण झाली आहे. 24 एप्रिल 2026 रोजी झालेल्या सुनावणीतही कोणताही ठोस निर्णय न होता न्यायालयाने पुढील सुनावणीची तारीख 6 मे 2026 अशी

## प्रतिबंधित गुटखा साठा व दोन पिकअपसह 13.70 लाखांचा मुद्देमाल जप्वा; शी पोलिसांची कारवाई

आरंभ मराठी / वाशी

वाशी पोलीस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी ( दि.23 ) दुपारी सु. रुई शिवारातील कॅनल परिसरात मोठी कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत महिंद्रा बोलेरो पिकअप ( क्र. एमएच 23 ए.यु. 1191 ) व अशोक लिलॅण्ड पिकअप ( क्र. एमएच 23 ए.यु. 3439 ) या दोन वाहनांमधून “प्रिमियम शॉट लक्झरी टोबॅको” या नावाचे लाल व हिरव्या रंगाचे एकूण 7,404 गुटखा पाउच आढळून आले. या गुटखा साठ्याची किंमत 4,70,880 रुपये असून, दोन्ही वाहनांसह एकूण मुद्देमालाची किंमत 13,70,880 रुपये इतकी आहे. सदर माल विक्रीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक व साठवणूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी तत्काळ गुटखा व वाहने जप्त करून संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.